**"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास" योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.**
सन २०२३-२४ करीता (लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) अंतर्गत
उल्हासनगर महानगरपालिका, जि. ठाणे करीता
रक्कम रु. १०.०० कोटी

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२२/प्र.क्र. २३६(११५)/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- २७ एप्रिल, २०२३.**

**संदर्भ:-**

(१) शासन निर्णय, क्र. शासन निर्णय क्रमांक-धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६ दिनांक १२ डिसेंबर, २०१७ व दिनांक ३० सप्टेंबर, २०२०.

(२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दिनांक १२ एप्रिल, २०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील महानगरपालिकांना मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्रमांक (२) अन्वये ठाणेमहानगरपालिकेस २०२३-२४ वर्षासाठी अर्थसंकल्पीत निधीतून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास"** योजनेअंतर्गत **उल्हासनगर महानगरपालिका, जि. ठाणे** क्षेत्रातील सोबत जोडलेल्या कामासाठी **रक्कम रु.१०,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दहा कोटी मात्र)** इतका निधी वितरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

**२.** सदर प्रकल्पा अंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा **"महानगरपालिका"** राहील.

**३.** "सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहील. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यान्वयन यंत्रणेच्या) तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी."

**४.** सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

**५.** "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

६. तांत्रिक मान्यता दिलेली कमी किमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) एकत्रित करून शासनाकडून एकत्रित प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात आलेली आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई- निविदा पद्धतीनेच करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

७. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व: उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

८. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

९. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन,संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

१०. सदर निधी दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करिता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

११. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, ठाणे यांना नियंत्रक अधिकारी, तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, ठाणे/ जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे यांनी सदरचा निधी कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

१२. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तींची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

१३. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१४. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

१५. या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबित असल्यास निधी आहरीत करू नये.असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

१६. आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदर निधी अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१७. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा. सदरचा निधी जिल्हाधिकारी यांनी थेट वळता करू नये.

१८. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-११९८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२१व दि.२८ मार्च,२०२२ अन्वये कार्यवाही करावी.

१९. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास,८०, सर्वसाधारण,१९१, महानगरपालिकांना सहाय्य,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना,(००) (०९) महागनरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद, (२२१७ ०९१३), ३१, सहाय्यक अनुदान, या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

२०. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. १२ एप्रिल, २०२३ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(श्रीकांत आंडगे)**
**उपसचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त, कोकण
३. जिल्हाधिकारी, ठाणे

४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर भवन, सातवा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
५. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका जि. ठाणे
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११. सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,नवी मुंबई - ४०० ६१४
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१३. जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे
१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई
१५. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

## शासन निर्णय क्रमांक- मनपा-२०२२/प्र.क्र. २३६(११५)/नवि-१६, दिनांक २७ एप्रिल, २०२३ सोबतचे विवरणपत्र

## उल्हासनगर महानगरपालिका, जि. ठाणे क्षेत्रातील कामे

| अ.क्र | कामांचे नांव | रक्कम रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर कॅम्प नंबर येथील पठतुमल गार्डन येथे जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी शेड बांधणे. | १०.०० |
| २ | उल्हासनगर येथील bk ne ९४७,९५१, ९५० ८९९ आणि ८९४ येथे सीसी पेवनेट आणि ड्रेन बनविणे | १०.०० |
| ३ | उल्हासनगर २ प्रभाग क्र ६ येथील ५७० हाजीमलंग बाबा दर्गा ओटी सेक्शन येथे सीसी पेकगेट आणि ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ४ | प्रभाग क्रमांक ६ मधील बॅरेक क्र. ५९३ आशाराम आश्रम समोर सीसी पेवमेंट आणि ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ५ | उल्हासनगर २ मधील प्रभाग क्रमांक ६ येथील बॅरेक क्र. ६२१ येथे सीसी पेवमेंट आणि ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ६ | उल्हासनगर येथील बॅरेक क्र. ६४ ते ६८ पर्यंत एम २५० रोड व नाली बनविणे. | १०.०० |
| ७ | उल्हासनगर येथील वाल्मिकी समाज हॉल स्वामी विवेकानंद स्कूल समोर सीसी पैसेज व नाली बनविणे | १०.०० |
| ८ | उल्हासनगर येथील आनंद मयू नगर वाल्मीक समाज bk no३० समोर सीसी पेसेज आणि नाली बलविणे | १०.०० |
| ९ | उल्हासनगर १ येथील bk no ३१.३६ व ३७ येथे सी सी पॅसेज व नाली बनविणे | १०.०० |
| १० | उल्हासनगर १ येथील संभाजी नगर येथे सी सी पैसेज व लादी लावणे. | १०.०० |
| ११ | उल्हासनगर येथील आदर्श नगर व परिसरात चेकर लाटी बसविणे व जाली बनविणे | १०.०० |
| १२ | उल्हासनगर येथील कीर्ती पथ व परिसरात देकर लादी बसविणे व नाली बनविणे. | १०.०० |
| १३ | उल्हासनगर येथील लाड बाई दवाखाना मागील परिसरात चेकर लादी बसविणे व नाली बनविणे. | १०.०० |
| १४ | उल्हासनगर येथील पारस किराणा समोरील परिसरात चेकर्स लादी बसविणे आणि नाली बनविणे | १०.०० |
| १५ | उल्हासनगर येथील मुकुंद नगर व परिचयत सी सी नाली व रस्ता तयार करणे. | १०.०० |
| १६ | उल्हासनगर येथील वाल्मीक समाज वस्ती तेथे विविध ठिकाणी सी सी पैसेज व नाली बनविणें. | १०.०० |

| अ.क्र | कामांचे नांव | रक्कम रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| १७ | उल्हासनगर येथील पाईप लाईन पोलिस लाइन येथील परिसरात सीसी रस्ता व नाली बनविणे. | १०.०० |
| १८ | उल्हासनगर प्रभाग क्रमांक १२ येथील आयोचा नगर हनुमान मंदिर येथे सी सी रस्ता तयार करणे. | १०.०० |
| १९ | उल्हासनगर ३ प्रभाग क्रमांक १२ मधील रामदेव अपार्टमेंट पाठीमागे लिप प्लाझा येथे सी सी रस्ता तयार करणे. | १०.०० |
| २० | उल्हासनगर प्रभाग क्रमांक ५ मधील राहुल नगर टेलिफोन एक्सचेंज व परिसरात सी.सी. रस्ता करणे | १०.०० |
| २१ | प्रभाग क्रमांक १ येथील शिवनेरी एमआयडीसी परिसरात सी.सी. रस्ता तयार करणे. | १०.०० |
| २२ | उल्हासनगर भीमनगर ते डॉ. गोपाल हॉस्पिटल पर्यंत व परिसरात सीसी रस्ता तयार करणे. | १०.०० |
| २३ | महात्मा फुले चौक ते आनंद मधु नगर व परिसरात सीसी रस्ता तयार करणे. | १०.०० |
| २४ | उल्हासनगर १ विठ्ठल मंदिर से एमआयडीसी टॉयलेट, ब्राम्हण पाडा परिसरात सीसी रस्ता तयार करणे. | १०.०० |
| २५ | उल्हासनगर ३ येथील हरिजन कॉलनी येथे सी सी रस्ता व नाली बनविणे. | १०.०० |
| २६ | उल्हासनगर ३ येथील सतनाम कॉलनी येथे सी सी रस्ता व नाली बनविणे. | १०.०० |
| २७ | उल्हासनगर १ येथील उल्हासनगर पोलिस स्टेशन येथे यखीय पोलिसांसाठी प्रतिक्षा कक्ष बांधणे. | २०.०० |
| २८ | मध्यवर्ती हॉस्पिटल उल्हासनगर ३ येथे दोन प्रतीक्षा कक्ष बांधणे. | २०.०० |
| २९ | मध्यवर्ती हॉस्पिटल उल्हासनगर ३ येथे संरक्षण भिंत बांधणे. | २५.०० |
| ३० | मध्यवर्ती हॉस्पिटल उल्हासनगर ३ येथे आर सी सी कमान आणि सी सी करणे. | २०.०० |
| ३१ | उल्हासनगर १ येथील मधुवन चौक ते साधू वासवानी पुतळा पर्यंत रस्ता तयार करणे | २५.०० |
| ३२ | उल्हासनगर १ प्रभाग क्रमांक ५ मधील राहुल नगर येथे returning बॉल बांधणे. | ३०.०० |
| ३३ | मध्यवर्ती हॉस्पिटल उल्हासनगर ३ येथील शवगृहा पासून ते मध्यवर्ती पोलिस स्टेशन पर्यंत सी सी रस्ता तयार करणे. | ३०.०० |
| ३४ | उल्हासनगर ३ येथील ३० कोठी ते कृष्णा कॉम्प्लेक्स व परिसरात सी सी रस्ता तयार करणे | ३०.०० |
| ३५ | उल्हासनगर ३ येथील न्यायालयांच्या (चोपडा कोर्ट) इमारतीच्या छतावर लोखंडी शेड बांधणे. | ४०.०० |

| अ.क्र | कामांचे नांव | रक्कम रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| ३६ | भाग ८ उल्हासनगर ३ येथील ४० कोटी ते कृष्णा कॉम्प्लेक्स पर्वत सीसी रोड तयार करणे. | ३०.०० |
| ३७ | उल्हासनगर प्रभाग ७ मधील आजाद नगर दूधनाथ यादव यांच्या घराजवळ दुर्गा माता समाज मंदिर बांधणे. | १०.०० |
| ३८ | वडार कॉलनी प्रभाग ७ उल्हासनगर सुभाष शिंदे यांच्या घरापासून ते गुप्ता किराणा स्टोअर्स पर्यंत सीसी रस्ता करणे. | १०.०० |
| ३९ | रमाबाई आंबेडकर नगर येथील सरोज हाऊस ते पब्लिक टॉयलेट पर्यंत सीसी नाली आणि गटर बनविणे. | १०.०० |
| ४० | आजाद नगर शास्त्री नगर चौक येथे शहिद चंद्रशेखर आजाद प्रवेशव्दार उभारणे. | २०.०० |
| ४१ | उल्हासनगर ३ येथील बॅ नं ११२५ फॉलोवर लाईन आणि परिसरात सीसी आणि ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ४२ | उल्हासनगर येथील नं ११२६ फॉलोवर लाईन हरिकिशन सहिब गुरुदारा येथे नागरिकांसाठी शौचालय बांधणे. | १०.०० |
| ४३ | उल्हासनगर ३ येथील बॅ नं ११३९ समाज मंदिर येथे नागरिकांसाठी शौचालय बनविणे. | १०.०० |
| ४४ | उल्हासनगर येथील बॅ.नं ११३० विनोद डिल्लोर व परिसरात येथे सीसी रोड आणि ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ४५ | उल्हासनगर ३ येथील बॅ. नं ११३२ व परिसरात येथे सीसी रोड आणि ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ४६ | उल्हासनगर ३ येथील हरिकिशन साहिब गुरुदारा च्या पाठीमागे फॉलोवर लाईन व पसिरात येथे सीसी रोड आणि ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ४७ | सीसी पॅसेज एम. २५० रस्ता पद्मा पैलेस ते परमानंद भंडारपर्यंत नाली विभाग २२ उल्हासनगर ३ आणि विविध ठिकाणी बांधकाम करणे. | २०.०० |
| ४८ | सीसी पॅसेज एम. २५० रस्ता दिनेश अपार्टमेंट ते सिंधू बुध सर्कलच्या मागे विभाग २२ उल्हासनगर ३ आणि विविध ठिकाणी नाला बांधणे. | २०.०० |
| ४९ | Bk no ९५० चौक ते bk ९३७ आणि ९३९ (विभाग २१.२२ रोड), उल्हासनगर ३ आणि विविध ठिकाणी सीसी पॅसेज M-२५०, नाला, रस्त्याच्या बाजूची पट्टया बांधणे. | १०.०० |
| ५० | प्रभाग २ येथील दिपक किराणा स्टोअर्स ते केवल रमानी हाऊस पर्यंत व परिसरात ३५० रोड व नाली बनविणे. | १०.०० |

| अ.क्र | कामांचे नांव | रक्कम रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| ५१ | प्रभाग २ येथील शिवशक्ती अपार्टमेंट ते पम्मी माता मंदिर पर्यत व परिसरात ३५० रोड व नाली बनविणे. | १०.०० |
| ५२ | प्रभाग २ येथील कन्हैया तबेला ते हिल व्हयू सोसायटी पर्यंत व परिसरात ३५० रोड व नाली बनविणे. | १०.०० |
| ५३ | प्रभागकर येथील खेमदार अपार्टमेंट ते लाहोरी पॅलेस पर्यत व परिसरात ३५० रोड व नाली बनविणे. | १०.०० |
| ५४ | भाग क २ येथील संत पहुराम अपार्टमेंट ते किंग पॅलेस पर्यंत व परिसरात ३५० रोड व नाली बनविणे. | १०.०० |
| ५५ | प्रभाग क्र. ६ येथील बेरेक नंबर २३० ते २३३ येथे व परिसरात सीसी पैसेज नाली बनविणे. | १०.०० |
| ५६ | प्रभाग ६ येथील जय माता दी ते भाजी मार्केट येथे व परिसरात ३५० रोड व नाली बनविणे. | १०.०० |
| ५७ | प्रभाग क६ येथील बेरेक नंबर ३५७ ते ३५९ व बेरेक नंबर ३५० ते ३५२ येथे व परिसरात सीसी पॅसेज नाली बांधणे. | १०.०० |
| ५८ | प्रभाग क्र ६ येथील बेरेक नंबर ३०७ ते ३०९ व ३१४ येथे व परिसरात सीसी पैसेज नाली बनविणे. | १०.०० |
| ५९ | प्रभाग क्र ६ येथील बेरेक नंबर ३२४ ते ३२६, बॅनं ३५० येथे ३५० रोड व नाली बनविणे. | १०.०० |
| ६० | प्रभाग क्र २ मध्ये बेरेक नंबर ११६ ते ११५ येथे विविध ठिकाणी सीसी पैसेज व ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ६१ | प्रभाग क २ मध्ये बेरेक नंबर १८०-१८१-१८२ येथे येथे सीसी एम २५० रोड व नाली बनविणे. | १०.०० |
| ६२ | प्रभाग क्र २ बॅरेक नंबर ९१ येथे एम २५० रोड बनिवणे. | १०.०० |
| ६३ | प्रभाग २ बॅरेक नंबर ९२-९३ एम २५० रोड बनविणे. | १०.०० |
| ६४ | प्रभाग २ बरेक नंबर ९५ येथे एम २५० रोड बनविणे. | १०.०० |
| ६५ | प्रभाग नंबर २ ब मध्ये गुरुनानक पंचायत सत्यसाई मार्केट उल्हासनगर र जाली व ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ६६ | प्रभाग नंबर २ ब मध्ये भारत पॅथेलॉजी ते उल्हासनगर पोलीस चौकी पर्यंत उल्हासनगर र नाली व ड्रेन बनविणे. | १०.०० |
| ६७ | प्रभाग नंबर २ ब मध्ये बेरेक नबर ३६२ ३६३ उल्हासनगर २ येथे जाली व ड्रेन बनविणे, | १०.०० |

| अ.क्र | कामांचे नांव | रक्कम रुपये (लक्ष) |
|---|---|---|
| ६८ | प्रभाग नंबर २ ब मध्ये बेरेक नंबर ६३, ६४ उल्हासनगर २ येथे सीसी नाली व सीसी बनविणे. | १०.०० |
| ६९ | प्रभाग नंबर २ ब मध्ये बेरेक नंबर ३६१, ३७० उल्हासनगर २ येथे सीसी नाली ड्रेन व सीसी बनविणे. | १०.०० |
| ७० | प्रभाग क्र १ येथील इंदिरा गांधी समाज मंदिर दुरूस्ती करणे | १०.०० |
| ७१ | प्रभाग क्र. १ येथील टिळक नगर टोपले ते उज्वला भांबरे यांच्या घरापर्यंत सीसी व चेकर्ड लादी व गटार बनविणे . | १०.०० |
| ७२ | प्रभाग १ ओमसाई दिपक देशमुख ते यशवंत सीसी, चेकर्ड लादी व गटार बनविणे. | १०.०० |
| ७३ | प्रभाग १ शाहाड गावठाण येळगील मढवी घरापासून ते प्रवेशव्दार पर्यंत सीसी गटार व चेकर्ड लादी बसविणे. | १०.०० |
| ७४ | प्रभाग १ शाहाड गावठाण ते सेचुरी शाळेपर्यंत बेचेस तसेच क्लब रोडला महानगरपालिकेच्या जागेवर योगासाठी मैदान सुशोभिकरण करणे | १०.०० |
| ७५ | उल्हासनगर येथील सवलदास निवास ते साईपार्क अपार्टमेंट पर्यत ड्रेनेज बनविणे. | १०.०० |
| ७६ | उल्हासनगर ३ येथील एन एस हार्डवेअर ते गीता भवन हॉटेल शिवाजी चौक अपार्टमेंट येथे ड्रेनेज बनविणे. | १०.०० |
| ७७ | उल्हासनगर ३ येथील रूपरेल हाऊस ते हरदेवी मेडिकल दशहरा मैदान येथे ड्रेनेज बनविणे. | १०.०० |
| ७८ | उल्हासनगर ३ येथील लक्ष्मी ज्वेलर्स ते सिध्दिविनायक शॉप इंदिरा गांधी गॉर्डन जवळ सीसी रोड बनविणे. | १०.०० |
| ७९ | उल्हासनगर ३ येथील ममता किराणा ते मनिष हाऊस दशहरा मैदान गॉर्डन जवळ ड्रेनेज बनविणे. | १०.०० |
| ८० | उल्हासनगर येथील बालाजी हॉटेल ते महेश हाऊस सेक्शन १७ जवळ सीसी रोड बनविणे. | १०.०० |
| ८१ | उल्हासनगर ३ येथील बॅरेक नंबर ८२० सेक्शन चेलाराम मार्बल येथे सीसी व ड्रेनेज बनविणे | |
| | **एकूण रक्कम रु. लक्ष** | **१०००.००** |